नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ६ । वर्ष : ४ थे । अंक : ३०३ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार दि. १८ ऑक्टोंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मराठवाडा पदवीधर मतदार संघातील नांदेड जिल्ह्याचा भुमिपुत्र अपक्ष उमेदवार शिंपाळकरांची प्रचारात आघाडी

नांदेड (समर्थ गांवकरी)

मराठवाडा पदवीधर मतदार संघातील विधानपरिषदेचे अपक्ष उमेदवार नांदेडचा भुमिपुत्र राजेंद्र लक्ष्मणराव शिंदे शिंपाळकर यांचे नांदेड जिल्ह्यासह मतदार संघातील समाजसेवेचे कार्य व दांडगा जनसंपर्क मतदारांच्या प्रत्यक्ष गाठी भेटीचा एकदरीत कौल पहाता त्याना समाज माध्यमातुन मिळत आसलेला मतदारांचा वाढता प्रतिसाद पहाता ते प्रचारात जोरदार आघाडी आघाडी घेत आसल्याचे एकंदरीत चित्र दिसुन येत आहे.

मराठवाडा पदवीधर मतदार संघातील मतदान येत्या २३ आक्टोबर रोजी पार पडणार आसुन या निवडणुकीत ४१ उमेदवार रिंगणात उतरले आसुन आता हि निवणुक प्रचाराचा दुसऱ्या टप्पा गाठ आसताना या निवडणुकीतील बिलोलीचे जेष्ठ पत्रकार सामाजिक कार्यकर्ते अपक्ष उमेदवार राजेंद्र लक्ष्मणराव शिदे – शिंपाळकर अनु. क्र. ३७ यांचे गत अनेक दशका पासून पत्रकारीते सोबतच सामाजिक कार्याच्या चळवळीच्या माध्यमातून शिक्षक, पदवीधर, सुशिक्षित बेकारांच्या प्रश्ना सोबतच शेतकऱ्यांचे व विविध वंचित घटकांचे प्रश्न प्रभाविपणे मांडुन त्याना न्याय मिळवुन देण्याचा त्यानी आजतगायत यशस्वी प्रयत्न केले. या त्यांच्या एंकदरीत विविध क्षेत्रातील यशस्वी सामाजिक कार्यामुळे नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात विविध क्षेत्राच्या माध्यमातून त्यांच मतदाराशी आसलेल मोठ संघटन या निवडणुकीत विजयासाठी त्याना मतदान रुपी मोठ बळ



मिळणार आहे. सध्या प्रचार फेरीचा दुसरा टप्पा गाठलेल्या प्रचार फेरीत राजेंद्र उर्फ राजु पाटील शिंपाळकरांनी प्रत्यक्ष गाठी भेटी व सोशल मिडीयासह वेगवेगळ्या माध्यमातून प्रचारात मोठी आघाडी घेतल्याची नांदेड जिल्ह्यातील या एकमेव भुमिपुत्र उमेदवारांची नांदेड जिल्ह्यात व मराठवाडा विभाग मतदार संघात एकदरीत जोरदार चर्चा आहे.

## दानपेटी सील बेकायदेशीर म्हणणारेच अध्यक्ष बेकायदेशीर
## संतु आई माता मंदिर ट्रस्टमधील वाद चिघळला!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील पिंपळगाव निपाणी येथील संतु आई माता मंदिर ट्रस्टच्या कारभारावरून विश्वस्तांमधील वाद पुन्हा चिघळला आहे. ट्रस्टचे अध्यक्ष डी. के. गोरडे हे २१ विश्वस्तांपैकी केवळ आठ विश्वस्तांच्या पाठिंब्यावर कारभार करीत असल्याचा, तर उर्वरित १३ विश्वस्त विरोधात असल्याचा आरोप ट्रस्टचे सचिव भीमाशंकर विश्वनाथ तोरमल यांनी केला आहे. ट्रस्टमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करताना तोरमल यांनी सांगितले की, आपण ट्रस्टचे कायदेशीर सचिव असतानाही भ्रष्टाचाराला विरोध केल्यामुळे आपण राजीनामा दिल्याची खोटी माहिती सोशल मीडियावर पसरवली जात आहे. संबंधित अध्यक्षांनी आपला राजीनामा प्रत्यक्ष किंवा सोशल मीडियावर सादर करावा, म्हणजे सत्य समाजासमोर येईल, असे आव्हानही त्यांनी दिले.

तोरमल यांच्या म्हणण्यानुसार, ट्रस्टमधील कथित गैरकारभाराविरोधात १३ विश्वस्तांनी धर्मादाय सहआयुक्त, पुणे येथे कलम ४१–ई अंतर्गत केस क्रमांक ४६/२०२३ दाखल केली होती. या प्रकरणाचा निकाल १५ जानेवारी २०२५ रोजी लागला असून, चौकशी निरीक्षकांच्या अहवालात अध्यक्षांच्या कारभाराबाबत गंभीर आक्षेप नोंदविण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. दानपेटीतील रक्कम आणि ऑनलाइन देणग्यांच्या पावत्यांमधील पैसे ट्रस्टच्या खात्यात जमा न होणे, ट्रस्टचे साहित्य परस्पर विकणे, दागिने बँकेच्या लॉकरमध्ये न ठेवता घरी ठेवणे, बोगस कर्मचारी नेमणे तसेच ट्रस्टच्या खात्याऐवजी वैयक्तिक खात्यांमधून आर्थिक व्यवहार करणे, असे आरोप त्यांनी केले आहेत. या पार्श्वभूमीवर धर्मादाय उपायुक्तांनी दानपेटी सील करण्याची कारवाई केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, ९ डिसेंबर २०२५ रोजी ठराव क्रमांक दोननुसार डी. के. गोरडे यांना अध्यक्षपदावरून बहुमताने हटविण्यात आल्याचा दावा तोरमल यांनी केला असून, त्यासंदर्भातील बदल अहवाल २९ डिसेंबर २०२५ रोजी धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर यांच्याकडे दाखल केल्याचे त्यांनी सांगितले. बदल अहवालाचा निर्णय प्रलंबित असताना गोरडे ट्रस्टचा कारभार करीत असल्याचा आक्षेपही त्यांनी घेतला.



चौकशी निरीक्षकांच्या अहवालाविरोधात गोरडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती; मात्र ती फेटाळण्यात आल्याचा दावाही तोरमल यांनी केला. पुणे येथील प्रकरणात आपल्या वकिलांनी अंतिम युक्तिवाद केला असताना दुसऱ्या बाजूने युक्तिवादास विलंब होत असल्याचा आरोप त्यांनी केला. ट्रस्टच्या कारभाराबाबत सुरू असलेल्या या वादात संबंधित अध्यक्षांची बाजू आणि न्यायालयीन आदेशांची अधिकृत प्रत उपलब्ध नसल्याने आरोपांची स्वतंत्र पुष्टी होऊ शकलेली नाही. त्यामुळे या प्रकरणातील पुढील कायदेशीर निर्णयाकडे भाविकांचे आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी औषधनिर्मिती कंपन्यांनी संशोधनावर भर द्यावा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस;औषधनिर्मिती क्षेत्रात संशोधन व नवोन्मेषाला चालना देण्यासाठी शासनाचे सहकार्य

मुंबई (समर्थ गांवकरी)

**औषधनिर्मिती क्षेत्रात संशोधन व नवोन्मेषाला चालना देऊन आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, किफायतशीर आणि सर्वसामान्यांना सहज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. जागतिक दर्जाची विद्यापीठे, संशोधन संस्था आणि औषधनिर्मिती कंपन्यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास या क्षेत्रात मोठी प्रगती साधता येईल. त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून आवश्यक धोरणात्मक व अन्य सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

स्ट्राझेनेका फार्मा इंडिया लिमिटेडच्या गोरेगाव येथील मुंबईतील जागतिक दर्जाच्या मुख्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कंपनीचे भारतातील अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्रवीण राव अक्किनेपल्ली, एशियाचे उपाध्यक्ष अरुण कृष्णा, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारताने जागतिक औषधनिर्मिती क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले असून, अमेरिका आणि युरोपसारख्या कडक नियमन असलेल्या बाजारपेठांमध्येही भारतीय जेनेरिक औषधांची मोठी मागणी आहे. भारतीय औषधनिर्मिती उद्योगाची जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि क्षमता यामुळे सिद्ध झाली आहे. आता या क्षेत्रात संशोधन आणि नवोन्मेष वाढविण्याची गरज आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून देशात उभारण्यात येणारा बल्क ड्रग पार्क महत्त्वाचा ठरणार असून, त्यातून औषधनिर्मिती क्षेत्रात व्यापक बदल घडतील, असे त्यांनी नमूद केले.

स्ट्राझेनेकाने कोविड–१९ महामारीच्या काळात केलेले योगदान भारत कधीही विसरणार नाही. कोविशिल्ड लसीमुळे देशातील नागरिकांना मोठा आधार मिळाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या 'लस मैत्री' उपक्रमांतर्गत भारताने ९९ देशांना कोविड प्रतिबंधक लसींचा पुरवठा केला. या माध्यमातून 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संस्कृतीची भावना जगासमोर प्रत्यक्षात आली. या कार्यात स्ट्राझेनेकाचे योगदान महत्वपूर्ण होते, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आरोग्यसेवेतील बदलांसाठी नवोन्मेष महत्वाचा असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औषधनिर्मिती, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि निदान पद्धतींमध्ये नवनवीन संशोधन होत आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजारांवरील उपचार अधिक प्रभावी करून मृत्यूचे प्रमाण अत्यल्प करण्याच्या दिशेने प्रयत्न होणे आवश्यक आहे. अचूक निदान, रुग्णाच्या गरजेनुसार उपचार आणि आधुनिक



औषधांच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा दर्जा उंचावता येईल. प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्यसेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी नवोन्मेष हाच महत्वाचा मार्ग आहे.

महाराष्ट्रात जागतिक दर्जाच्या विद्यापीठांचे आगमन होत असून, स्ट्राझेनेकाने या विद्यापीठांसह तसेच राज्यातील नामांकित संशोधन संस्थांसोबत सहकार्य करावे. अशा सहकार्यामुळे संशोधनाला संस्थात्मक स्वरूप मिळेल आणि नवोन्मेष क्षेत्रात कार्यरत असलेल्या तरुणांच्या प्रतिभेचा उपयोग करता येईल.

## पवई तलाव चक्क ३२ टक्के गाळाने भरला

### पाणलोट क्षेत्रात पाण्याचे प्रमाण झाले कमी

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सर्व धरणांमधील गाळाचे आतापर्यंत ११ ते १२ टक्के असतानाच मुंबईतील पवई तलावातील गाळाचे प्रमाण मात्र चक्क ३२ टक्के असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पवई तलावातील पाण्याचे क्षेत्र हे ३२ टक्क्यांनी कमी झाले आहे. तलावातील गाळ काढण्यासाठी तांत्रिक अभ्यास सुरु करण्यात आला आहे. यासाठी आयआयटी मुंबईच्या मदतीने पहिल्या टप्प्यातील कामाला सुरुवात झाली आहे.

पवई तलाव हा मुंबई उपनगर परिसरातील एक प्रमुख तलाव असून तलावाचे जलक्षेत्र सुमारे ५५७ एकर असून त्याची परिधीय लांबी सुमारे १०.२ किलोमीटर आहे आणि तलावाची पाणी साठवण क्षमता अंदाजे ५४५५ दशलक्ष लीटर इतकी आहे. पवई तलावातील गाळाचे परिमाण काढण्यासाठी महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत असलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक या संस्थेसोबत पत्र व्यवहार केलेला होता. त्यानुसार माहे मार्च– एप्रिल २०२४ मध्ये मुंबई महापालिका आणि मेरी नाशिक आणि हायड्रोग्राफिक सर्वेक्षण गृह विभाग (बंदरे आणि परिवहन) महाराष्ट्र सागरी मंडळ जल आलेखक विभाग, मुंबई या विभागांकडून संयुक्तरित्या डीजीपीएस बेस्ड बॅथीमेट्री या तंत्रज्ञानाचा वापर करून गाळ सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आणि याबाबतचा गाळ सर्वेक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे.

या प्राप्त झालेल्या अहवालानुसार पवई जलाशयाची एकूण साठवण क्षमता ५.४५५ दशलक्ष घनमीटरपासून ३.६९३ दशलक्ष घनमीटर इतकी कमी झालेली आहे, म्हणजेच तलावाची पाणी साठवण क्षमता ३२.३० टक्क्यांनी कमी आली.

पवई तलावातील गाळ काढणे बाबत

पवई तलावातील गाळ काढणे बाबत व्यवहार्यता तपासणेकरीता स्वयंसेवी संस्था मेसर्स ग्रीन यात्रा यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तलावातील गाळ काढण्यासाठीची तांत्रिक पद्धती ठरविणे आणि काढलेल्या गाळाची विल्हेवाट लावण्यासाठी विविध तांत्रिक बाबी तपासण्यासाठी आय. आय. टी., मुंबई या संस्थेतील तज्ञ सल्लागार आणि हे काम करत असताना तलावातील जैव विविधता, जलचर इ. ना धोका उद्भवू नये याकरिता बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) या संस्थेची मदत घेण्यात येणार आहे. सद्यस्थितीत ग्रीन यात्रा यांचेमार्फत टप्पा १ अंतर्गत काम सुरू करण्यात आलेले आहे.

## आमदार सत्यजीत तांबे यांच्या प्रयत्नांना यश संगमनेरच्या रस्ते विकासासाठी १० कोटींचा निधी मंजूर

### बसस्थानक ते प्रवरापुलापर्यंतच्या रस्त्याचा होणार विकास ; रुंदीकरणासह ड्रेनेज व्यवस्थेचाही समावेश

संगमनेर (समर्थ गांवकरी)

संगमनेर शहराच्या पायाभूत सुविधा विकासाला चालना देण्यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांच्या प्रयत्नांतून राज्य महामार्ग क्र. ७१ वरील महत्त्वाच्या रस्त्याच्या विकासासाठी १० कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. अमृतकाल रस्ते विकास आराखड्यांतर्गत एकत्रित तरतुदीतून हा निधी मंजूर करण्यात आला आहे.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पुढाकारातून इंजिनिअरिंग कॉलेज ते संगमनेर हायटेक बस स्थानक या रस्त्याचे काम अत्यंत दर्जेदार झाली असून हा रस्ता मॉडेल ठरला आहे. पुन्हा संगमनेर ते रायते फाटा या रस्त्याच्या कामालाही मंजुरी मिळाली असून काम प्रगतीपथावर आहे. संगमनेर बसस्थानक, पीडब्ल्यूडी कॉर्नर ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि पुढे दिल्ली नाकामार्गे प्रवरापुलापर्यंतच्या रस्त्याचा या प्रकल्पांतर्गत विकास करण्यात येणार आहे. शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या मार्गाच्या सुधारणेसाठी महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सत्यजीत तांबे यांनी केलेल्या प्रयत्नांना या निधी मंजुरीमुळे महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे.

या कामामध्ये संपूर्ण रस्त्याचे रुंदीकरण, पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज व्यवस्था तसेच विविध युटिलिटी लाईन्ससाठी आवश्यक कामांचा समावेश आहे. त्यामुळे रस्त्याची क्षमता वाढण्यास, वाहतुकीचे नियोजन सुधारण्यास आणि शहरातील नागरी सुविधांना बळकटी मिळण्यास मदत होणार आहे.

संगमनेर शहरातील रस्ते आणि पायाभूत सुविधांचा विकास अधिक सक्षम करण्याच्या दिशेने आमदार सत्यजीत तांबे यांच्या प्रयत्नांतून मिळालेला हा



निधी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याने संगमनेर शहरातील नागरिक व युवकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# अखेर जनतेच्या एकजुटीला यश! नारायणगाव-वाशी एसटी बससेवा पुन्हा सुरू होणार!

(समर्थ गांवकरी)

गेल्या दीड-दोन वर्षांपासून बंद असलेली नारायणगाव-वाशी एसटी बससेवा अखेर दसऱ्याच्या मुहूर्तावर, मंगळवार,दिनांक २० ऑक्टोबर २०२६ पासून सकाळी ८ वाजता नारायणगाव - सावरगाव - येणेरे - जुन्नर ९.३० वा - माळशेजमार्गे - कल्याण - शिळफाटा - कोपरखैरणे - वाशी व पुन्हा दुपारी २ वाजता याच मार्गाने परतीचा प्रवास सुरू होवून सायंकाळी ६.३० वाजता नारायणगाव येथे पोहचेल. थोडक्यात जुन्या मार्गाने आणि नियमित वेळेत पुन्हा सुरू होत आहे.येणेरे, सावरगाव, नारायणगाव आणि परिसरातील २० ते २५ गावांतील नागरिकांसाठी ही निश्चितच आनंदाची बातमी आहे.

परंतु मित्रांनो,ही बससेवा पुन्हा सुरू होण्यामागे केवळ एका व्यक्तीचा प्रयत्न नाही,तर अनेकांनी केलेला पाठपुरावा, ग्रामस्थांची एकजूट आणि प्रशासनाच्या सहकार्याचे हे फलित आहे.

या संपूर्ण प्रयत्नांमध्ये काही व्यक्तींनी विशेष पुढाकार घेतला, त्यांच्या योगदानाची दखल घेणे ही आपली जबाबदारी आहे.

पुणे समाचारचे प्रमुख श्री.मारुती ढोले यांचा पुढाकार!

या प्रश्नाला योग्य दिशा देण्याचे आणि त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्याचे महत्त्वपूर्ण काम पुणे समाचारचे प्रमुख श्री.मारुती ढोले यांनी केले.संबंधित परिसरातील तब्बल १५ ते १६ गावांच्या सरपंचांची पत्रे मिळवून घेणे,हा प्रश्न एकट्या गावाचा नसून अनेक गावांच्या जनतेचा आहे,हे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे आणि बससेवा सुरू होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे,ही त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली.

एखादा प्रश्न मांडणे सोपे असते,परंतु तो प्रश्न मार्गी लागेपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे,त्यासाठी लोकांना एकत्र आणणे आणि प्रशासनापर्यंत जनतेची मागणी पोहोचवणे,यासाठी चिकाटी लागते.श्री. मारुती ढोले यांनी ही जबाबदारी पार पाडली,त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन!

जिल्हा परिषद सदस्य श्री. गुलाबशेठ पारखे साहेब यांचे प्रत्यक्ष प्रयत्न!

जिल्हा परिषद सदस्य श्री.गुलाब पारखे साहेब यांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले.त्यांनी स्वतः पत्र देऊन ग्रामस्थांच्या समवेत एसटी डेपोमध्ये प्रत्यक्ष जाऊन बससेवा पूर्ववत सुरू व्हावी यासाठी प्रयत्न केले.

जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्यासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरून पाठपुरावा करणे,हीच लोकप्रतिनिधींकडून जनतेची अपेक्षा असते.या प्रश्नासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही मनः पूर्वक आभार!

सामाजिक कार्यकर्ते श्री.संतोषदादा चव्हाण यांचे योगदान!

सामाजिक कार्यकर्ते श्री.संतोषदादा चव्हाण यांनीदेखील नारायणगाव-वाशी बससेवा पुन्हा सुरू व्हावी यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले. जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला हा प्रश्न मार्गी लागावा,यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकारही महत्त्वाचा आहे.ग्रामस्थांच्या समवेत स्वतः डेपोमध्ये जाऊन हि बस कल्याण पर्यंत न जाता ती वाशी पर्यंत गेलीच पाहिजे या साठी आग्रह धरला व डेपो कर्मचार्यांनीही त्यांची विनंती मान्य केली आहे.कारण बस वाशीपर्यंत जाणे हीच तर खरी गरज आहे.

या प्रश्नासाठी ज्यांनी ज्यांनी आपापल्या परीने प्रयत्न केले,त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि आभार!

एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांचेही मनःपूर्वक आभार!

नारायणगाव एसटी डेपोचे अधिकारी श्री. अरगडे साहेब,कुटे मॅडम आणि श्री.लांडे साहेब यांनीही ही बससेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे बससेवा पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला, याबद्दल त्यांचे विशेष आभार!

विशेषतः कुटे मॅडम यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी एक महत्त्वाची अपेक्षा व्यक्त केली.ती म्हणजे,बस सुरू झाली पाहिजेच,पण ती नियमितपणे चाललीही पाहिजे!

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नारायणगावहून वाशीकडे जाताना बसला पुरेसा प्रतिसाद मिळतो,मात्र वाशीहून परतीच्या प्रवासात प्रवाशांची संख्या तुलनेने कमी असते.

आता हाच मुद्दा आपण सर्वांनी गांभीर्याने समजून घेतला पाहिजे.

बस सुरू झाली आता ती टिकवण्याची जबाबदारी आपली!

मित्रांनो, नारायणगाव-वाशी ही बस केवळ प्रवासाचे साधन नाही,तर गावाकडच्या सामान्य माणसाला मुंबई आणि नवी मुंबईशी जोडणारी एक महत्त्वाची जीवनवाहिनी आहे.

नवी मुंबईच्या एपीएमसी मार्केटमध्ये कष्ट करणारे हमाल, कामगार,फळभाजी विक्रेते,छोटे व्यापारी, चाकरमानी,विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा अनेकांसाठी ही बस अत्यंत उपयोगाची आहे.

गेल्या दीड-दोन वर्षांपासून बस बंद असल्यामुळे अनेकांना कल्याणमार्गे प्रवास करावा लागत होता. हातात जड बॅगा, सोबत लहान मुले, घरातील ज्येष्ठ व्यक्ती आणि त्यात वारंवार बस बदलण्याचा त्रास या सगळ्यांचा विचार केला,तर ही बससेवा किती महत्त्वाची आहे,हे लक्षात येईल.

मात्र,आता केवळ आनंद व्यक्त करून थांबून चालणार नाही.

वाशीहून गावाकडे परतताना बसला पुरेसे प्रवासी मिळावेत, यासाठी आपण सर्वांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. काही प्रवासी खासगी वाहनांनी किंवा अन्य मार्गांनी प्रवास करत असतील,तर त्यांनीही या बससेवेचा पर्याय नक्की विचारात घ्यावा.

वेळ,सोय,प्रवासाचे अंतर आणि उपलब्ध सुविधा यांचा विचार करून शक्य तिथे एसटीचा वापर वाढवला,तर या सेवेला टिकून राहण्यासाठी निश्चितच मदत होईल.

**■ प्रयत्न अनेकांचे यश जनतेचे आता जबाबदारीही आपलीच!**

**■ सामान्य माणसाच्या प्रश्नासाठी उठवलेला आवाज कधीच वाया जात नाही,याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे!**

कारण एसटी महामंडळाला बस चालवण्यासाठी प्रवाशांचा प्रतिसाद आवश्यक आहे आणि प्रवाशांना चांगली सेवा मिळण्यासाठी बससेवा नियमित सुरू राहणे आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत.

आपली बससेवा सुरू राहणे ही केवळ एसटी महामंडळाची जबाबदारी नाही,तर आपण सर्वांचीही सामूहिक जबाबदारी आहे!

आज अनेकांच्या प्रयत्नांमुळे ही बस पुन्हा सुरू होत आहे. उद्या प्रवाशांच्या सहकार्यामुळे ती कायमस्वरूपी सुरू राहिली,तर तेच या सर्व प्रयत्नांचे खरे यश असेल.

चला तर मग, नारायणगाव, सावरगाव,येणेरे आणि परिसरातील सर्व गावांतील नागरिकांनी या बससेवेचे मनापासून स्वागत करूया. स्वतः या सेवेचा लाभ घेऊया आणि आपल्या नातेवाइकांनाही तिची माहिती देऊया.

प्रयत्न मारुती ढोले यांचे असोत, गुलाब पारखे साहेबांचे असोत,संतोषदादा चव्हाण यांचे असोत किंवा इतर कोणत्याही ग्रामस्थाचे या सर्व प्रयत्नांचा अंतिम उद्देश एकच होता,तो म्हणजे सामान्य जनतेची गैरसोय दूर होणे!

म्हणूनच या यशाचे श्रेय कोण्या एका व्यक्तीला न देता, जनतेच्या प्रश्नासाठी एकत्र आलेल्या सर्वांना दिले पाहिजे.




शेवटी एवढेच

प्रश्न जनतेचा होता, प्रयत्न अनेकांचे होते आणि यशही जनतेचेच आहे!

आता बससेवा सुरू झाली आहे,ती अखंड सुरू राहण्यासाठी आपणही आपले कर्तव्य पार पाडूया!

आजपासून या बस साठी ऑन लाईन रिजर्वेशन बुंकीग सुरू करण्यात आली आहे याचीही सर्वांनी विशेष नोंद घ्यावी.

एसटी आपली सेवा आपली आणि ती टिकवण्याची जबाबदारीही आपलीच!

नारायणगाव-वाशी एसटी बससेवा पुन्हा सुरू होत असल्याबद्दल सर्व प्रवासी बांधवांचे मनःपूर्वक अभिनंदन!

श्री विश्वास ढोले.

## जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूलची दमदार कामगिरी; मुलींचा संघ द्वितीय, तर मुलांचा संघ तृतीय

संगमनेर (समर्थ गांवकरी)

जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, अमृतनगर, संगमनेर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे.




स्पर्धेत शाळेच्या १७ वर्षांखालील (ण-१७) मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक, तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली. खेळाडूंची मेहनत, शिस्त, सांघिक भावना आणि जिंकण्याची जिद्द या यशातून अधोरेखित झाली. विद्यार्थ्यांनी मैदानावर दाखवलेली जिद्द आणि खेळातील कौशल्य यामुळे अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या क्रीडा गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली.

मुलींच्या संघाचे नेतृत्व कर्णधार कु. जोशना भोये हिने, तर मुलांच्या संघाचे नेतृत्व कर्णधार साई बोडके याने केले. दोन्ही संघांना शाळेचे क्रीडा शिक्षक व मार्गदर्शक रविंद्र कदम, जयराज दुशिंग, रोहित गाडे आणि वृशाली भागवत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि सांघिक समन्वयाच्या बळावर हे यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षकवृंद आणि क्रीडाप्रेमींनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे आणि संगमनेरचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात, संस्थेचे विश्वस्त व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्त शरयू देशमुख, विश्वस्त अनिल शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. बी. धुमाळ, शाळेचे प्राचार्य आशिष कुमार यांच्यासह सर्व विभागप्रमुख व शिक्षकांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## तेजोमय आणि पवित्र रूप, वृषभारुढ महातपस्विनी माता (पार्वती)/महागौरी

**प्रिय वाचकहो मागील सातव्या कथेत आपण रक्तबीज राक्षसाचा व शुंभ व निशुंभाचा कालरात्री देवीने त्यांचे रक्त शोषण करून कसा पराभव केला, व सृष्टीवरील चराचराला कसे तारले हे आपण पाहिले,**

पहिल्या कथेपासूनच वाचकांना पुढे नक्की काय,व कोणती कथा याची उत्सुकता लागली, समर्थ गावकरीच्या सहकार्यातून या सुरस कथा आपणापर्यंत पोचल्या

अनेकदा सर्व भाविक देवदेवतांचे पूजन करताना त्यामागील इतिहास अनेकांना माहीत नसतो, म्हणूनच या कथा पुष्प मालिकेतून तुमच्या पर्यंत पोचवण्याचा प्रयत्न समर्थ गावकरीच्या माध्यमातून करण्यात आला,आणी हळूहळू ही मालीका पुढे पुढे सरकत परतीच्या प्रवासापर्यंत पोचली अनेकांनी दूरध्वनी वरून व फेसबूक मधून कथा सुंदर असल्याचे छान अभिप्राय दिले, त्या सर्वांचे

**गावकरी समूहाकडून मन:पूर्वक आभार वाचकहो,**

आज आपण नवरात्रीच्या आठव्या कथेच्या, म्हणजेच माता महागौरीच्या दिव्य चरित्राकडे वळूया...

नवरात्रीच्या आठव्या दिवशी दुर्गा देवीच्या माता महागौरी' या रूपाची पूजा केली जाते.

**वाचकांना हे सांगावे लागेल की महागौरी हे आदिशक्ती पार्वती मातेचेच रूप आहे,**

तिचा वर्ण अत्यंत गोरा आणि चंद्राप्रमाणे प्रकाशमान आहे, त्यामुळे तिला 'महागौरी म्हटले जाते. तिचे वस्त्र आणि आभूषणे पांढऱ्या रंगाची असून ती शांत, प्रसन्न आणि वरमुद्रेत असते. माता चतूर्भुज म्हणजे चार हात असलेली व भगवान शंकराची महा उपासक आहे, या महागौरीचे वाहन वृषभ (बैल) आहे, म्हणूनच तिला 'वृषारूढा' असेही म्हणतात. तिचे हे रूप भक्तांच्या जीवनातील सर्व पाप आणि दु:खांचा नाश करून त्यांना पवित्र करते.

पौराणिक कथेनुसार, माता पार्वतीने भगवान शिवाला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी अत्यंत कठीण तपश्चर्या केली होती या दीर्घ तपश्चर्येदरम्यान उन्हात आणि पावसात राहिल्यामुळे देवीचे गोरे शरीर काळे ठिक्कर पडले

**वृत्त संकलन, कोतुळ प्रतिनिधी अशोकराव शेळके ९९२१५८३९९७**

तरीही तिची निष्ठा व दृढ विश्वास ठेवून तिने तिची कठोर तपस्या सोडली नाही, तपस्ये च्या काळात अनेक हिंश्र प्राणी, ऊन पाऊस याचा कोणताही परिणाम तिच्यावर झाला नाही, शेवटी या कठोर तपस्येमुळे भगवान शंकर विचाराधीन झाले तपस्या काळात ती अत्यंत कृश व काळी पडली, तिचे तेज निस्तेज झाले, हे पाहून तिच्या या भक्तीवर प्रसन्न होऊन भगवान शिवाने तिच्या अंगावर गंगाजल शिंपडले, व माता महागौरीच्या रुपात तपस्या केलेल्या पार्वतीशी शंकरांनी विवाह केला गंगाजल शिंपडताच

देवी पार्वती वीजेप्रमाणे अत्यंत कांतीमान, तेजोमय आणि पूर्वी पेक्षाही गोऱ्या रंगाची झाली. तेव्हापासून पार्वतीला 'महागौरी' असे नाव प्राप्त झाले

**पूजन फलप्राप्ती**

माता महागौरीची म्हणजेच शिवभार्या पार्वतीची उपासना केल्याने साधकाच्या मनातील सर्व मलीनता नष्ट होते आणि त्याला अक्षय पुण्याची प्राप्ती होते

दुर्गाअष्टमीच्यादिवशी या पूजेला विशेष महत्त्व असते, ज्यामुळे कुटुंबात सुख, शांती आणि समृद्धी नांदते.

पुढे आपण ९ व्या व शेवटच्या कथा भागातील अतिशय महत्वाची म्हणजे देवी दुर्गामाता सिद्धीदात्री व तिचा अवतार याची माहिती पाहणार आहोत.

**कथापुष्प आठवे**




# धांदरफळच्या बाजारतळावर दोन गटात प्रचंड धुमश्चक्री!

## सत्ताधारी व विरोधकांच्या परस्परविरोधी तक्रारी

## महिला सरपंचासह नऊजण जखमी

संगमनेर (समर्थ गांवकरी)

आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या पुढारलेले धांदरफळ बुद्रूक गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान ज्येष्ठनेते वसंतराव देशमुख यांच्या वादग्रस्त वक्तव्याने राज्यात चर्चेत आले होते. तेव्हापासूनच या गावातील सामाजिक शांततेला नख लागले असून गेल्या दीड-दोन वर्षाच्या काळात अनेक विषयांवरुन सत्ताधारी आणि विरोधकांचे गट एकमेकांच्या समोर उभे ठाकले असून तालुका पोलीस ठाण्यात अर्धा डझनहून अधिक अदखलपात्र गुन्ह्यांच्या नोंदी आहेत. या राजकीय वादाची परिणीती आता मात्र गंभीर वळणावर गेली असून शुक्रवारी घडलेल्या सशस्त्र संघर्षाने दोन्ही बाजूच्या १५ जणांवर अतिशय गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहेत. आता या सर्वांना अटक टाळण्यासाठी भूमीगत होवून न्यायालयीन संघर्ष करावा लागणार आहे. त्यातून धांदरफळमधील सामाजिक सौहार्दाची पूर्णतः वाट लागण्याची शक्यता आहे.

**गेल्या विधानसभा कोणत्यान् निवडणुकीपासून कोणत्या कारणाने सतत चर्चेत येणाऱ्या धांदरफळमधून पुन्हा एकदा धक्कादायक वृत्त समोर आले आहे. यावेळी दुपारी घडलेल्या किरकोळ गोष्टीची विचारणा करण्यावरुन दोन गटात संघर्ष निर्माण होवून बाजारतळावर उभारलेल्या दांडियाच्या मांडवातच सशस्त्र धुमश्चक्री उडाली. गावातील सत्ताधारी आणि विरोधक अशा या वादात दोन्ही बाजूच्या लोकांनी एकमेकांवर लाकडी दांडके आणि दगडांचा यथेच्छ वापर केला. या गदारोळात धांदरफळच्या सरपंच उज्वला देशमाने यांच्यासह दोन्हीबाजूच्या मिळून नऊजणांना दुखापती झाल्या. शुक्रवारी रात्री घडलेल्या या प्रकाराबाबत दोन्हीबाजूने एकमेकांविरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्या असून तालुका पोलिसांनी १५**

जणांवर भारतीय न्यायसंहितेतील गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. या घटनेतून धांदरफळ बुद्रूक मधील राजकीय वादाला आता हिंसक वळण मिळाल्याचेही स्पष्ट झाले आहे.

याबाबत धांदरफळच्या सरपंच उज्वला देशमाने यांचे पती नवनाथ यांनी दिलेल्या पहिल्या तक्रारीनुसार शुक्रवारी (ता. १६) दुपारी चारच्या सुमारास गावातील प्रशांत बाळासाहेब कोल्हे यांनी त्यांच्या पिकअप वाहनाची धडक देत बाजारतळावर दांडियासाठी उभारलेल्या मांडवाचा लोखंडी पाईप तोडला होता. या प्रकारानंतर त्यांनी फिर्यादीचा भाऊ देवीदास यांना फोन करुन शिवीगाळही केली, याबाबत तक्रारदाराने तालुका पोलिसांना कळवल्याचा उल्लेखही तक्रारीत करण्यात आला आहे. रात्री साडेआठच्या सुमारास फिर्यादी नवनाथ देशमाने, सरपंच उज्वला देशमाने यांच्यासह गावातील अन्य मंडळींसह मांडवाजवळ उभे असताना प्रशांत कोल्हे यांच्यासह प्रवीण कारभारी कोल्हे, ऋषिकेश कैलास कोल्हे, कमलेश दिलीप डेरे, ओंकार अण्णा तोरकडी, प्रवीण बंडू गोर्डे, दिलीप श्रीरंग डेरे यांच्यासह दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले व दोघांनाही नाहक शिवीगाळ करु लागले.

त्यावेळी नवनाथ देशमाने यांनी शिवीगाळ का करीत आहात ? असा प्रश्न करुन दुपारच्या घटनेबाबत विचारणा करताच त्या सर्वांनी लोखंडी रॉड, लाकडी दांडके, फायटर, दगड-विटांचा वापर करुन दोघांनाही बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांच्या मदतीला धावलेल्या प्रशांत प्रवीण देशमाने व नवनाथ विठ्ठल नाईकवाडी यांनाही त्या सर्वांनी बेदम मारहाण करीत जखमी केले. यावेळी प्रशांत कोल्हे याने फिर्यादीच्या पोटाला चाकू लावून जीवे मारण्याची

धमकी दिली तर, दिलीप डेरे यांनी गळ्यातील दीडतोळ्याची सोन्याची चेन ओढून घेतल्याचे दाखल तक्रारीत म्हटले आहे. या सर्वांची वैद्यकीय तपासणी

झाल्यानंतर पोलिसांनी वरील सातजणांसह अज्ञात दोघांवर भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत दुसऱ्या गटाकडूनही प्रवीण कारभारी कोल्हे यांनी आज पहाटे विरोधी तक्रार दिली

असून त्यात नवनाथ भास्करराव देशमाने, नवनाथ नाईकवाडी,

प्रशांत देशमाने, विशाल काळे, अजिंक्य क्षीरसागर यांच्यासह दोघा अनोळखी व्यक्तिंनी

आपण मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी गेलो असता शिवीगाळ व धक्काबुक्की करीत लोखंडी रॉड, लाकडी दांडके,

चाकू, दगड-विटांनी मारहाण केली व गळ्यातील सोन्याची चेन आणि हातातील




घड्याळ काढून घेतल्याचे म्हटले आहे. या मारहाणीत फिर्यादीसह प्रशांत कोल्हे, ओंकार तोरकडी, ऋषिकेश कोल्हे व कमलेश डेरे असे पाचजण जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. संगमनेर तालुक्यातील राजकीय घडामोडींसह आर्थिकदृष्ट्या पुढारलेल्या गावांमध्ये गणना असलेल्या धांदरफळमध्ये गेल्या दीड- दोन वर्षांपासून सातत्याने राजकीय धुसफूस सुरु आहे. त्यातून यापूर्वी एकमेकांवर हल्ले करण्याचे प्रकारही घडले असून पोलिसांच्या दप्तरी

अशा अर्धा डझन प्रकरणांची नोंद आहे. त्यात शुक्रवारच्या घटनेचाही समावेश झाला असून या प्रकाराने श्री क्षेत्र रामेश्वराच्या माध्यमातून विकासाच्या दिशेने धावणाऱ्या धांदरफळच्या अंतर्गत सामाजिक सौहार्दाला डंख लागला आहे. किरकोळ कारणावरुन गावातील महिला व तरुणींसाठी दांडियासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सुरु

असताना घडलेला हा रक्तरंजीत प्रकार धक्कादायक असून त्यातून गावाचा विकास खुंटण्याची अधिक शक्यता आहे. या घटनेतून दोन्ही बाजूच्या १५ जणांवर दहा वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद असलेल्या गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल दाखल झाल्याने पोलीस दप्तरी

नोंद झालेल्यांना आता अटक टाळण्यासाठी झगडावे लागणार आहे.

# आमदार झाल्यानंतर शंभर वर्षांनी अकोलेत आलो, जन्मभूमीत आल्याचा मनस्वी आनंद : आ. हेमंत रासने

अकोले (समर्थ गांवकरी)





आमदार झाल्यानंतर शंभर वर्षांनंतर अकोलेत येत असल्याची भावना व्यक्त करताना पुणे शहरातील कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने म्हणाले की, अकोले येथे आल्यानंतर आपल्या गावात आल्याचा मनस्वी आनंद होत आहे. देशात आणि राज्यात फिरत असताना जन्मभूमीबद्दलचे प्रेम, आस्था आणि जिव्हाळा कायम आहे. मी आमदार असलो तरी कासार समाजातील प्रत्येक कार्यकर्ता आमदार झाला आहे, अशी माझी भावना आहे. समाजाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी भविष्यात समाजाचा प्रतिनिधी म्हणून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

अकोले येथील कासार समाजाच्या कालिका मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त शुक्रवारी रात्री आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी अकोले शहर कासार समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी आपल्या राजकीय प्रवासात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या कार्यकर्त्यांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. त्यांच्या सहकार्यामुळे पुणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम करण्याची तसेच स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली. आमदारकीचे तिकीट मिळाल्यानंतर समाजबांधवांनी पुण्यात येऊन प्रचार केला. अल्पसंख्याक समाजातून आमदार होण्याची संधी मिळाली असली, तरी समाजातील प्रत्येक व्यक्ती आमदार झाल्यासारखे वाटते, असेही ते म्हणाले. यावेळी आनंद डांगरा यांनी मनोगत व्यक्त करून आमदार रासने यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. बाळासाहेब कोळपकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले, माजी ग्रामपंचायत सदस्य सुभाष कोळपकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, तर रामेश्वर रासने यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य सागर वैद्य, रोटरी क्लब अकोलेचे संस्थापक अध्यक्ष अमोल वैद्य, विनायक रासने, दिनेश जुन्नरकर, संतोष रावअंदुरे, अनिलशेठ भांडेकर, रमाकांत कानडे, निलेश तळेगावकर, सुनील कोळपकर, संजय कोळपकर, विनोद रासने, दिनेश रासने, अनिल कोळपकर, मुकुंद जुन्नरकर, कैलास सासवडे, भारत रासने, प्रशांत रासने, राजेंद्र रासने, सुनील सासवडे, राहुल सासवडे, पराग कोळपकर, सतीश रावअंदुरे, संतोष कोळपकर, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, भाजपचे मंडळ अध्यक्ष राहुल देशमुख, ज्येष्ठ नेते धनंजय संत, मच्छिंद्र मंडलिक, सचिन जोशी यांच्यासह कासार समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर आमदार रासने यांनी सुनील कोळपकर यांच्या निवासस्थानी, डी. के. मोबाईल शॉपीचे संचालक दिनेश रासने यांच्या दुकानात तसेच पत्रकार अमोल वैद्य आणि भाजपच्या नगरसेविका शितल वैद्य यांच्या महालक्ष्मी कॉलनीतील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी संबंधित परिवारांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. वैद्य यांच्या निवासस्थानी अकोले तालुक्याचे माजी आमदार व भाजपचे नेते वैभवराव पिचड यांच्याशीही त्यांचा संवाद झाला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, सेवानिवृत्त शिक्षक मधुकरराव बिबवे, सेवानिवृत्त प्राचार्य शिवाजीराव बिबवे, जनार्दन नवले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील याच्याकडून शहापूर तालुक्यातील दुष्काळाची पाहणी

शहापूर (समर्थ गांवकरी)



माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी आज शहापूर तालुक्यातील काही गावांमध्ये थेट शेतात जाऊन दुष्काळाची पाहणी केली. तसेच भातपिकाचे ९० टक्क्यांहून अधिक नुकसान झाल्यामुळे ठाणे जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

शहापूर तालुक्यातील सारंगपुरी, कोठारे, पायरवाडी, जांभूळवाड, डोळखांब गावांना आज कपिल पाटील यांनी भेट दिली. त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून भात पिकाच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केली. राज्यातील इतर तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. मात्र, ठाणे जिल्ह्यात अद्यापी दुष्काळ जाहीर झालेला नाही. इतर भागाप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची स्थिती बिकट आहे. पाऊस नसल्यामुळे भात पिकात फक्त तूस राहिला आहे. हळवार भाताच्या काही ठिकाणी कापणी सुरू असून, केवळ १० ते १२ टक्के पिक हाती आले आहे. अंदाजे ९० टक्के भाताचे नुकसान झाले असून, ठिकठिकाणी भातपिके पाण्याअभावी करपली आहेत. मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत, असे कपिल पाटील यांनी सांगितले. या परिस्थितीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार यांचे पुन्हा लक्ष वेधले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायम शेतकऱ्यांना साथ दिली आहे. त्यामुळे त्या या दुष्काळातही शेतकऱ्यांच्या पाठीशी राहतील.

ठाणे जिल्ह्यातील दुष्काळाबाबत नक्कीच सहानुभूतीने निर्णय घेतला जाईल, असा विश्वास माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी व्यक्त केला. या वेळी माजी आमदार पांडुरंग बरोरा, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष भास्कर जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त,वाचन प्रेरणा दिन संपन्न



अर्धापूर (समर्थ गांवकरी)

जि.प. हायस्कूल, मालेगाव ता. अर्धापूर जि.नांदेड येथे दि. १५ गुरुवारी रोजी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस असल्यामुळे त्यांच्या प्रतिमेला शाळेचे मुख्याध्यापक पुप्पलवाड आर.एस. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.व त्याचबरोबर त्यांचा जन्मदिवस हा संपूर्ण भारतात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यामुळे शाळेतील सर्व विद्यार्थी, शाळेत असलेल्या सुसज्ज अशा वाचनालयातील आपल्या आवडीचे पुस्तके घेऊन शाळेच्या मैदानात बसून पुस्तके, अगदी मंत्रमुक्त होऊन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आर.एस. पुप्पलावाड, शिवा कांबळे, अनुजा देशपांडे, गणेश शिराळ, विद्याताई वट्टमवार,करुणा पवार, श्रीमती. कोमल हिंगमिरे,भागवत सुनेवाड, कल्पना हाडकर, गजानन खुपसे, प्रदीप दंडे उपस्थित होते.

### अतनूर येथे वन्यजीव सप्ताहानिमित्त जैवविविधता संवर्धन व ग्राहक जनजागृती कार्यक्रमाची उत्साहात सांगता



जळकोट (समर्थ गांवकरी)

वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून जैवविविधता संवर्धन ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिजामाता शाळा जळकोट रोड, अतनूर (ता. जळकोट) येथे दि.१७ नोव्हेंबर वार शनिवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आलेल्या वन्यजीव आणि जैवविविधता जनजागृती मोहिमेची अत्यंत उत्साही वातावरणात सांगता झाली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये निसर्ग, प्राणी, पक्षी आणि पर्यावरणाच्या संरक्षणाबाबत व्यापक मार्गदर्शन करण्यात आले. या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्डाचे सेवानिवृत्त सचिव बी. एन. कांबळे हे होते. तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य जी. एस. घोरबांड, दलितमित्र, प्राणी-पक्षी मित्र व व्यसनमुक्ती चळवळीचे खंदे कार्यकर्ते बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, आणि प्राचार्य व्ही. एस. कणसे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी व्यासपीठावर हिप्पळनारीच्या सरपंच इंदरबाई रामचंद्र शिंदे, सरपंच प्रतिनिधी चंद्रकांत रामचंद्र शिंदे, प्रा. वर्षाताई बिरादार-मरगणे, जिजामाता महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. रूक्मीनबाई सोमवंशी, मायाताई बिरादार, वसुंधरा महिला मंडळाच्या सचिव सौ. संध्या शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या मायाताई कांबळे आणि राजकुमार कापडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान बोलताना सेवानिवृत्त सचिव बी. एन. कांबळे यांनी निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वन्यजीव आणि जैवविविधतेचे रक्षण करणे ही आजच्या काळाची मोठी गरज असल्याचे सांगितले. प्राणी-पक्षी मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर यांनी वन्यजीवांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना प्राणी व पक्षांवर दया करण्याचे तसेच व्यसनमुक्तीचे आवाहन केले.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामसेवकांना मुख्यालयी थांबणे बंधनकारक

## विनापरवानगी मुख्यालय सोडल्यास शिस्तभंगाची कारवाई; मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे निर्देश

नांदेड (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा, रोजगार हमी योजनेची कामे आणि इतर टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना (ग्रामसेवकांना) मुख्यालयी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. विनापरवानगी मुख्यालय सोडणाऱ्या किंवा कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिला आहे.

ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांच्या १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीतील सूचनांनुसार हे निर्देश देण्यात आले आहेत. दुष्काळी परिस्थितीत ग्रामस्थांना तातडीने मदत मिळावी आणि टंचाई निवारणाची कामे प्रभावीपणे राबविता यावीत, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर सक्षम यंत्रणा कार्यरत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय ग्राम पंचायत अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कार्यभार असलेल्या ग्रामसेवकांच्या भेटीचे वार आणि वेळ गटविकास अधिकाऱ्यांमार्फत निश्चित करण्यात येणार आहेत. संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागात भेटीचे वेळापत्रक आणि अधिकाऱ्यांचा मोबाईल क्रमांक असलेला माहिती फलक लावणे बंधनकारक राहणार आहे. या वेळापत्रकाची प्रत सरपंच, पंचायत समिती कार्यालय आणि तहसील कार्यालयातील टंचाई कक्षाला देण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतीला भेट देताना अधिकाऱ्यांनी पाणीटंचाईची स्थिती, टँकरने पाणीपुरवठा करण्याची गरज, विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, रोजगार हमी योजनेतील कामांची मागणी, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता तसेच ग्रामस्थांच्या अडचणींचा आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशांची अंमलबजावणी होते की नाही, हे तपासण्यासाठी विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्यामार्फत गावोगावी आकस्मिक तपासणी करण्यात येणार आहे. तसेच या कामाचा साप्ताहिक आढावा घेतला जाणार असून, सर्व तालुक्यांतील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या भेटीचे वेळापत्रक १९ ऑक्टोबरपर्यंत जिल्हा परिषद कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, रोजगार आणि जनावरांच्या चाऱ्यासह आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून जबाबदारीने काम करावे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील तरतुदींनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# अॅड. पंचशील कांबळे यांच्यावरील आकस बुद्धीने हद्दपारीची कार्यवाही रद्द करा : नांदेड अभिवक्ता संघाची मागणी

नांदेड (समर्थ गांवकरी)

अॅड. पंचशील विक्रमराव कांबळे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ५६(१)(ब) अन्वये सुरू असलेली हद्दपारीची कार्यवाही ही आकस बुद्धीने असून ती तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी नांदेड अभिवक्ता संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

नांदेड अभिवक्ता संघ, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांच्या वतीने दि. १५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे निवेदन सादर करण्यात आले.

अॅड. पंचशील विक्रमराव कांबळे हे नांदेड अभिवक्ता संघाचे सक्रिय सदस्य असून जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड तसेच संबंधित न्यायालये आणि तालुका स्तरावरील कनिष्ठ न्यायालयांमध्ये वकिली व्यवसाय करीत आहेत. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ५६(१)(ब) अन्वये सुरू करण्यात आलेली कार्यवाही ही आकस बुद्धीने असल्याचा आरोप नांदेड अभिवक्ता संघाने केला आहे.

सदरील हद्दपारीच्या कार्यवाहीमुळे अॅड.पंचशील कांबळे यांच्या वकिली व्यवसायावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून, त्यांच्या व्यवसायाच्या तसेच उपजीविकेच्या अधिकारावर मोठा गदा येत आहे. त्यामुळे सदर कार्यवाहीचा फेरविचार करून ती तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर नांदेड अभिवक्ता संघाचे अध्यक्ष अॅड. यदूपत अर्धापूरकर, उपाध्यक्ष अॅड. संगमेश्वर देलमाडे, महिला उपाध्यक्ष अॅड. दिपाली डोणगावकर (गोरे), सचिव अॅड. कपिल पाटील गाडेगावकर, महिला सहसचिव अॅड. सुजाता बगाटे, कोषाध्यक्ष अॅड. मंगेश जामनिक, विशिष्ट सहाय्यक अॅड. प्रदीप राठोड, कार्यकारिणी सदस्य अॅड. कार्तिक बोकारे, स्वीकृत सदस्य अॅड. जावेद खान पठाण तसेच नांदेड अभिवक्ता संघाच्या इतर सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे निवेदन नांदेड अभिवक्ता संघाच्या वतीने अॅड. भिमरत्न कांबळे यांनी निवासी जिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्याकडे दिले आहे.

# श्री सत्य साई सेवा समितीच्या सहकार्याने तळवाडे जिल्हा परिषद शाळेचे नूतनीकरण

## इमारत व स्वच्छतागृहाचे उद्घाटन उत्साहात संपन्न



ठाणे (समर्थ गांवकरी)

श्री सत्य साई सेवा समिती, तळवाडे-ठाणे यांच्या सौजन्याने नूतनीकरण करण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळा तळवाडे येथील शालेय इमारत व स्वच्छतागृहाच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन आज, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या, स्वच्छ आणि सुविधायुक्त शैक्षणिक वातावरणाची उपलब्धता झाली आहे.

शाळेच्या नूतनीकरणांतर्गत संपूर्ण वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेच्या दृष्टीने नवीन हँडवॉश सुविधा तसेच मुला मुलींसाठी स्वतंत्र नवीन स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य, स्वच्छता आणि शैक्षणिक प्रगती यांना प्राधान्य देणारा हा उपक्रम ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

या उद्घाटन सोहळ्यास श्री सत्य साई सेवा समितीचे अरुण सर, देवेंद्र कोपिकर , दिगंबर सर, आनंदिता मॅडम, बूधाजी बरतड , मच्छिंद्र मराडे, शहापूर सरपंच मायाताई बरतड, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी हिराजी वेखंडे , शिवानी पवार विस्तार अधिकारी डोळखांब, माजी शिक्षक डोके गुरुजी, रोंगटे सर तसेच श्री सत्य साई सेवा समितीचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या विकासासाठी करण्यात आलेल्या या कार्याचे कौतुक केले.

शिक्षण क्षेत्रात सामाजिक संस्थांच्या सहभागातून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. श्री सत्य साई सेवा समितीने पुढाकार घेऊन शाळेच्या नूतनीकरणासाठी केलेले सहकार्य समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारे आहे. अशा सेवाभावी उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित व आनंददायी वातावरणात शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळेल.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतील शिक्षकवृंद आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने श्री सत्य साई सेवा समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे शाळेच्या विकासाला नवी दिशा मिळाली असून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.

# श्रीगोंदा न्यायालयात 'समान काम, समान वेतन' याकरिता काळया फिती लावून शासनाचा निषेध

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचा-यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजुर करून ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावावर शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने न्यायालयीन कर्मचा-यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. समान कामासाठी समान वेतनाच्या मागणीसाठी महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयीन कर्मचा-यांनी आता आंदोलनाची भूमिका घेतली असून, मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा देण्यात आला आहे.

'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रलंबित मागणीसाठी श्रीगोंदा येथील न्यायालयीन कर्मचा-यांनी १६ ऑक्टोबर २०२६ रोजी काळया फिती लावून कामकाज करत शासनाचे लक्ष वेधले. सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव गेल्या २० ते २२ महिन्यांपासून शासनाकडे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. शासनाने मागणी मान्य न केल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा विविध कर्मचारी संघटनांनी दिला आहे.

महाराष्ट्र राज्य गट क महासंघ, लघुलेखक महासंघ, बेलिफ महासंघ व शिपाई महासंघ यांच्या माध्यमातून हे आंदोलन सुरू आहे. मा. उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील दुरयम न्यायालयीन कर्मचा-यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. मात्र हा प्रस्ताव अद्याप मंजुर झालेला नसल्याने कर्मचा-यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. मागणी मान्य न झाल्यास यंदाची दिवाळी साजरी न करण्याचा निर्धारही कर्मचा-यांनी व्यावेळी यक्त केला आहे. त्यामुळे शासन या मागणीवर काय निर्णय घेते याकडे राज्यातील न्यायालयीन कर्मचा-यांचे लक्ष लागले आहे.

यावेळी जिल्हा न्यायालयाचे अधिक्षक व्ही. पी वाघमारे म्हणाले की, न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि अत्यंत कष्टाने कर्मचारी काम करीत आहे. शासनाने या आंदोलनाची वेळीच दखल घेतली नाही तर ५ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील सर्व न्यायालयीन कर्मचारी एक दिवस पूर्णतः सामूहिक रजेवर जातील. यामुळे ग्यायालयीन कामकाज पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता असल्याने शासनाने तातडीने यावर तोडगा काढावा.



यावेळी न्यायालयातील अधिक्षक व्ही. पी. वाघमारे, यु.एस. मोटकर, बी. जे. झिणे, श्रीमती सरोदे, हौडगे, शहाजी दातीर, आनंद कारंजकर, मुश्तकीम शेख, सचिन डमरे, श्रीमती महादेवी चव्हाण, श्रीमती श्रध्दा भंडारी, आकांक्षा वांदेकर, कुंडलिक बेलेकर, सुशांत कदम, बालाजी खुडे, शेखर मेहेत्रे, सचिन सरवदे, दिपक मदने, सागर खडके, सागर धायतडक, दिगांबर शेळके आदि न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वारणीच्या शिरपेचात मानाचा तुरा!

अकोले (समर्थ गांवकरी)



**वारणी :** वारणी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी अभिमानास्पद कामगिरी सीए गणेश महादेव बडे यांनी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागामार्फत सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांच्या मान्यताप्राप्त यादीत त्यांचे नाव समाविष्ट झाले आहे. त्यांच्या या यशामुळे वारणी गावाच्या नावलौकिकात आणखी भर पडली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने १३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी मान्यताप्राप्त लेखापरीक्षकांची यादी जाहीर केली. या यादीत सीए गणेश बडे यांना स्थान मिळाल्याने त्यांच्या व्यावसायिक वाटचालीतील हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. सनदी लेखापाल म्हणून कार्यरत असलेल्या गणेश बडे यांनी आपल्या व्यावसायिक पात्रतेच्या बळावर सहकार क्षेत्रात योगदान देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार, लेखांकन आणि आर्थिक शिस्त यांना बळकटी देण्यासाठी पात्र लेखापरीक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणे ही त्यांच्या दृष्टीने उल्लेखनीय बाब आहे. ग्रामीण भागातून पुढे येत व्यावसायिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या गणेश बडे यांचे हे यश गावातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे वारणीच्या शैक्षणिक व व्यावसायिक परंपरेचा गौरव वाढला असून, गावाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने ही आनंदाची बातमी ठरली आहे. सीए गणेश महादेव बडे यांच्या या यशाबद्दल वारणी परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, नातेवाईक आणि हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. वारणीचा अभिमान, व्यावसायिक यशाची नवी ओळख!

### लिंगदेवमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



लिंगदेव (फापाळेवाडी) (समर्थ गांवकरी)

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना पाट्या, वह्या व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जर्मनी येथे कार्यरत असलेले लिंगदेवचे भूमिपुत्र राजेंद्र रामभाऊ होलगीर यांच्या पत्नी सुनीता होलगीर यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. परदेशात कार्यरत असतानाही आपल्या गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योगदान देण्याच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब गोडसे, भीमाशंकर हांडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित फापाळे, अशोक फापाळे, संदीप फापाळे व पालक उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे आणि ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे यांनी होलगीर दाम्पत्याचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

### श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा




श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

मुलगी म्हणजे केवळ एक व्यक्ती नसून ती आपल्या घरातील एक महत्त्वाची घटक आहे, तिला वेळेत शिक्षण देणे गरजेचे आहे, तिला योग्य ते आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या पाहिजेत असे प्रतिपादन सह दिवाणी न्यायाधीश ए. एम. मुजावर यांनी केले. येथील जिल्हा न्यायालयामध्ये तालुका विधी सेवा समिती यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश डी पी शिंगाडे साहेब होते. पुढे बोलताना ए. एम. मुजावर साहेब म्हणाले की, मुलींचे कमी वयातच लग्न लावून दिल्यानंतर कमी वयात गर्भधारणा होते, त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यांची नैसर्गिक वाढ होणे अपेक्षित आहे ती वाढ होत नाही. या सर्व गंभीर विषयावर समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. राजस्थान आणि महाराष्ट्रीतील काही भागामध्ये बालविवाह अजूनही चालू आहेत. या अनिष्ट रिती परंपरा बंद करण्याची आवश्यकता आहे. सामाजिक भान ठेवून समाजामध्ये वावरणे आवश्यक आहे. या कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश एस.एच. साळुंखे, सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर यु. वाय. बोराडे-कपूर, सह दिवाणी न्यायाधीश, क, स्तर पी. व्ही, पाटील, आर. बी. खवले, श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे, ॲड. व्ही. एन. घोडके, ॲड. एस.बी. सातपुते, ॲड. आसवले, ॲड. एस. एम. पवार, ॲड, चैत्राली साळुंके, पक्षकार आणि न्यायालयीन कर्मचारी हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. कविता डहाळे, ॲड. काळे यांनी केले तर श्रीगोंदा बार संघाचे अध्यक्ष ॲड, जे. बी. शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी रुग्णांच्या माध्यमातून गावोगावी पाणी बचतीची जनजागृती करावी! आमदार डॉ किरण लहामटे

### आमदार डॉ. किरण लहामटे यांचे आवाहन; आत्मा शारदीय नवरात्रोत्सव व रास-दांडिया महोत्सव उत्साहात संपन्न

अकोले (समर्थ गांवकरी)





वैद्यकीय व्यवसायातील धकाधकीच्या जीवनातून डॉक्टरांना विरंगुळा मिळावा, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, परस्परांतील स्नेहबंध दृढ व्हावेत आणि सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा मिळावी, या उद्देशाने अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने विविध सामाजिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतात. याच उपक्रमांचा एक भाग असलेला 'आत्मा शारदीय नवरात्रोत्सव २०२६ व भव्य रास-दांडिया महोत्सव' गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता महाराजा लॉन्स, अकोले येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला अकोलेचे कार्यसम्राट आमदार डॉ. किरणजी लहामटे, नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे, अकोले नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सोनालीताई नाईकवाडी, पुष्पाताई लहामटे, गिरिजाताई पिचड, अकोले ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब मेहेत्रे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. श्यामकांत शेटे, डॉ. उमा कुलकर्णी, डॉ. अनिल वाघ, डॉ. सखाराम घनकुटे आणि डॉ. गणेश नवले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आरोग्यसेवेबरोबरच पाणी बचतीचा सामाजिक संदेश द्या!

यावेळी आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा, महिलांसाठीचे विशेष जनजागृती कार्यक्रम आणि विविध आरोग्य तपासणी शिबिरांचे कौतुक केले. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित करताना त्यांनी डॉक्टरांनी रुग्णांच्या माध्यमातून गावोगावी पाणी बचतीची जनजागृती करावी, असे आवाहन केले.

डॉक्टरांचा समाजाशी थेट संपर्क असतो. त्यामुळे आरोग्यसेवेबरोबरच पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरणविषयक जागृतीसाठीही डॉक्टर प्रभावी भूमिका बजावू शकतात, असा संदेश त्यांच्या आवाहनातून देण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या असोसिएशनच्या कार्याचे अभिनंदन करून त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉक्टरांच्या आरोग्यासाठी सांस्कृतिक उपक्रम कौतुकास्पद

माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे यांनी अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या रुग्णहिताच्या आणि समाजोपयोगी उपक्रमांचे विशेष कौतुक केले. डॉक्टरांच्या आरोग्याला प्राधान्य देतानाच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आनंद, उत्साह आणि एकोपा निर्माण करण्याचा असोसिएशनचा प्रयत्न स्तुत्य असल्याचे त्यांनी नमूद केले. नवरात्रोत्सव आणि गणेशोत्सवानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

'आत्मा भवन'साठी जागा उपलब्ध करून देण्याचे नगराध्यक्षांचे आश्वासन

अकोले नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सोनालीताई नाईकवाडी यांनी 'आत्मा भवन'साठी नियोजित जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले. तसेच भविष्यात अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांना शक्य ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यांच्या या भूमिकेमुळे उपस्थित डॉक्टरांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

मान्यवरांचे स्वागत, सूत्रसंचालन व आभार

कार्यक्रमाच्या प्रारंभी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संदीपजी कडलक यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. मंजुश्री राहणे आणि डॉ. अनुप्रिता शिंदे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले, तर असोसिएशनचे सचिव डॉ. प्रतीकजी घोडके यांनी आभार मानले.

डॉक्टरांच्या उत्स्फूर्त सहभागाने दांडिया महोत्सव रंगला

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. नीलेश सहाणे, डॉ. सागर कोल्हार, डॉ. तेजस शहा, डॉ. नितीन चासकर, डॉ. रवींद्र डावरे, डॉ. नूतन कडलक, डॉ. दिपाली बेलोशे, डॉ. कावेरी काकड, डॉ. मनीषा नाईकवाडी, डॉ. पूनम कानवडे, डॉ. मोहसीन शेख, डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. संतोष देशमुख, डॉ. प्रमोद कोंडावळे, डॉ. संतोष कानवडे, डॉ. आसिफ तांबोळी, डॉ. सुनील वैद्य, डॉ. दर्शन बंगाळ, डॉ. निमनाथ चौधरी आणि डॉ. सतीश वाळुंज यांनी विशेष परिश्रम घेतले.

रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, तालबद्ध संगीत, दांडियाचा ठेका आणि डॉक्टरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महाराजा लॉन्स परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. वैद्यकीय क्षेत्रातील व्यस्त दिनचर्येतून काही क्षण आनंदाचे अनुभवण्याबरोबरच परस्परांतील मैत्री, आपुलकी आणि संघभावना वृद्धिंगत करणारा हा महोत्सव संस्मरणीय ठरला.

आरोग्यसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक एकोपा यांची सुंदर सांगड घालणाऱ्या अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सनातन धर्मसभा: शारदीय व्याख्यानमाला

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

**यशस्वीतेसाठी मनातील आनंद विचारांतून प्रगट व्हायला हवा: अनिरुद्ध देवचक्के**

अध्यात्माचे अधिष्ठान लाभले की आत्मा परमात्म्याशी एकरूप होतो. त्यातून मिळणारी प्रसन्नता मनाला ऊर्जात्मक आनंद मिळवून देते आणि हाच आनंद जेव्हा आपल्या विचारातून प्रगट व्हायला लागतो तेव्हा यशस्वी होणं आणखी सोपं होऊन जातं, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अनिरुद्ध देवचक्के यांनी केले. अहिल्यानगर येथील सनातन धर्मसभेच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित शारदीय व्याख्यानमालेत

'अंतर्मन ते आत्मभान : शरीर, मन आणि अध्यात्माचा प्रवास' या विषयावर ते बोलत होते. आत्म रक्षा, कुटूंब रक्षा, स्त्री रक्षा, गो रक्षा, देश रक्षा आणि धर्म व संस्कृती रक्षा ही माणसाची आद्य कर्तव्ये आहेत. या कर्तव्यांचा पालन करताना अध्यात्मिक विचारांचा आधार घेऊन स्वतःच मन, बुद्धी आणि आत्मा बळकट आणि समर्थ बनवणं आवश्यक आहे.

धर्मग्रंथांचे अध्ययन, संत साहित्यातील विचारानुरूप आचरण, थोरामोठांशी सतत संवादी राहून विचारांचं आदान प्रदान करत राहणं हेच खरंतर परिपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे लक्षण आहे. सध्याच्या मानसिक दृष्ट्या अस्थिर अशा वातावरणामध्ये माणसाचं हायपर होणं, नकार पचवण्याची क्षमता नाहीशी होणं आणि छोट्या-मोठ्या कारणांसाठी हमरी- तुमरीवर उतरणं वाढत चाललेलं आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे प्रत्येक क्षणाला काहीतरी नवीन विचार ही आसक्ती वाढत चाललेली आहे. त्यामुळे कोणत्यातरी एका विचारावर सखोल मंथन करण्याची क्षमता नष्ट होत चाललेली आहे. वैचारिक दृष्ट्या हा कमकुवतपणा आपल्या प्रगतीसाठी अत्यंत घातक आहे.

स्वस्थ आणि समृद्ध समाजाचे हे लक्षण नव्हे, असे सांगून ते पुढे म्हणाले की,

समाजातील प्रत्येक घटकाचे व्यक्तिमत्व परिपूर्ण बनवून उन्नत आणि प्रगतशील समाजासाठी झटत राहणं हे आपलं ध्येय असायला हवं.त्यासाठी सर्व सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक संघटनांनी सामाजिक एकोपा आणि बळकटीकरण करण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यातूनच भविष्यात समाजाला पोषक अशी पिढी निर्माण होऊ शकेल, असा विश्वास अनिरुद्ध देवचक्के यांनी व्यक्त केला. व्याख्यानाच्या सुरुवातीला संस्थेचे मंत्री दिनकर देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे मंत्री रमेश देशपांडे यांच्या हस्ते अनिरुद्ध देवचक्के यांचा सत्कार वेदमूर्ती उमेश वाळुंजकर यांनी केलेल्या मंत्रघोषात करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार उमेश नगरकर,उदय वाईकर, अनंत देशपांडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांची प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयास भेट

### ओम शांती केंद्राच्या माध्यमातून मनुष्याच्या मन-बुद्धीची शुद्धता-रामदास गोल्हार

नेवासा (समर्थ गांवकरी)



उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे अहिल्यानगर जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांनी नेवासा येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयास भेट देऊन शिव बाबांच्या अधिष्ठानाचे दर्शन घेतले. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात मनः शांती, सकारात्मक विचार आणि आत्मिक समाधान मिळविण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या केंद्राच्या माध्यमातून भरकटलेल्या जीवांना जीवनाचा योग्य मार्ग मिळत असून, अनेक जण सुखी आणि समाधानी जीवन जगत आहेत असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार यांनी केले.

नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय परिसरातील ओम शांतीनगर येथे असलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयास रामदास गोल्हार व सौ. विजयाताई गोल्हार यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी ते बोलत होते.या प्रसंगी ओम शांती केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी सरला दीदी व राजयोगिनी वंदना दीदी यांनी त्यांचे स्वागत केले. पत्रकार बाळासाहेब देवखिळे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी बोलताना रामदास गोल्हार म्हणाले की, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून समाजातील अनेक व्यक्तींना आध्यात्मिक मार्गदर्शन मिळत आहे. राजयोग आणि सकारात्मक विचारांच्या माध्यमातून मनाची एकाग्रता वाढविण्यासह जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो. मन आणि बुद्धीची शुद्धता साधण्यासाठी अशा आध्यात्मिक केंद्रांचे योगदान मोलाचे आहे.

माउंट अबूला प्रत्येकाने एकदा तरी भेट द्यावी! असे आवाहन करत गोल्हार यांनी माउंट अबू येथील ब्रह्माकुमारी मुख्यालयाला भेट देण्याचे महत्त्वही विशद केले. या भेटीसाठी आपण स्वतः ट्रॅव्हलची व्यवस्था करण्यास पुढाकार घेऊ अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

आध्यात्मिक विचार, राजयोग आणि मनःशांतीचा संदेश देणाऱ्या ओम शांती केंद्राच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. या भेटीमुळे आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार आणि सामाजिक सलोखा वाढविण्याच्या कार्याला प्रोत्साहन मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी ओम शांती केंद्राच्या समृध्दी दिदी.सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र गाडेकर,वसंतराव मुंगसे,बाळासाहेब देवखिळे,इंजिनियर प्रशांत गोल्हार,रेवन्नाथ शेळके, मच्छिंद्र देठे,दिपाली शिरसाठ,मनिषा पिंपळे यांच्यासह ओम शांती केंद्रातील भाऊ बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या समान वेतनाच्या मागणीसाठी आंदोलन

### दिवाळीपूर्वी वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याची मागणी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन, जिल्हाधिकारी कार्यालय समोर आज केले आंदोलन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)




महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान कामासाठी समान वेतन लागू करावे, वेतनश्रेणीतील तफावत दूर करावी आणि प्रलंबित मागण्यांची पूर्तता करावी, अशी मागणी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास न्यायालयीन कर्मचारी आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम राहणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यातील जिल्हा न्यायालये, तसेच उच्च न्यायालयाच्या अधीनस्थ न्यायालयांमध्ये कार्यरत आणि सेवानिवृत्त न्यायिक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील तफावत, वेतन निश्चिती, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न आणि प्रलंबित शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत लक्ष वेधण्यात आले आहे. निवेदनानुसार, केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे राज्य शासनाने विविध विभागांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भात निर्णय घेतले. मात्र, न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याची भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे. त्यामुळे दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे वेतनाबाबत असलेली तफावत दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी सुधारण्यासंदर्भात यापूर्वी विविध प्रस्ताव आणि शिफारशी शासनाकडे २० महिन्यापूर्वी सादर करण्यात आल्या आहेत. त्यावर अद्याप अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. समान कामासाठी समान वेतन या तत्त्वानुसार न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

आंदोलनाचा इशारा

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात यापूर्वीही शासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. विविध निवेदने, चर्चासत्रे आणि आंदोलनांच्या माध्यमातून मागण्यांचा पाठपुरावा करण्यात आला. मात्र, प्रश्न प्रलंबित राहिल्याने आंदोलनाची भूमिका घेण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

न्यायालयीन कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. तसेच वेतनश्रेणीतील तफावत दूर करून सुधारित वेतनाचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दिवाळीपूर्वी मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी विनंतीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हा न्यायालयातील शंभर ते दीडशे निवृत्त न्यायालय कर्मचारी यावेळी उपस्थित होते सदर आंदोलनाचे वेळी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस अविनाश नगरकर यांनी समान काम समान वेतन याबाबत सविस्तर माहिती व मागणी केली. तसेच श्री पिरजादे यांनी यांनीही मनोगत व्यक्त करून सदर मागण्या लवकरात लवकर मान्य करावे ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अविनाश नगरकर, हेमंत जोशी, शंकर गावडे , शिवाजी संदुपटला , विजय पोंदे, लांबदाडे, मधुकर वामन, तरडे,अवसरे, लोखंडे, श्री राठोड यासह महिला प्रतिनिधी श्रीमती शारदा जाधव, रागिनी माळवदे, स्नेहा राव आदी मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# तरुणाईच्या विचारांतूनच घडेल सक्षम भारत

## सामाजिक बांधिलकीतून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्या : बाळासाहेब थोरात






**पुणे (समर्थ गांवकरी)**

पुणे येथील व्हीआयटीच्या सोशल वेल्फेअर अँड डेव्हलपमेंट कमिटीच्या वतीने आयोजित 'झठखड्ञ् २०२६' या उपक्रमाला माजी मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत जीवनप्रवास, ग्रामीण विकास, शिक्षण, युवा नेतृत्व, पर्यावरण, शाश्वत विकास आणि समाजपरिवर्तन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तरुणाई ही देशाची खरी ताकद असून, तरुणांच्या विचारांतून समाजाला नवी दिशा आणि त्यांच्या कृतीतून परिवर्तन घडते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

आजच्या तरुणांनी समाजातील प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ बदलाची अपेक्षा न करता स्वतः बदलाचा भाग बनणे आणि स्वतः ला शिस्त लावून तिचे पालन करणे, हीदेखील राष्ट्रसेवेची महत्त्वाची पायरी आहे. विद्यार्थिदशेत केवळ शिक्षण घेणे पुरेसे नसून, समाजातील घडामोडींचे भान ठेवणे आणि सामाजिक प्रश्नांप्रती आपली जबाबदारी ओळखणे तितकेच आवश्यक आहे. विद्यार्थी चळवळींमधून नेतृत्व घडते आणि समाजाप्रती जाणीव असलेली नवी पिढी तयार होते, असे थोरात यांनी सांगितले.

ग्रामीण विकासाच्या संदर्भात बोलताना थोरात यांनी २००९ मध्ये राज्यात एक लाख शेततळी निर्माण करण्याचा घेतलेला निर्णय आणि आपल्या मंत्रीपदाच्या काळातील विविध महत्त्वपूर्ण निर्णयांचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला. जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न सोडवण्याबरोबरच शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देता येते, यावर त्यांनी भर दिला. तसेच, वसंतदादा पाटील यांच्या काळात विनाअनुदानित महाविद्यालयांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाच्या संधी वाढवण्याच्या प्रक्रियेला मिळालेली चालना आणि त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची खुली झालेली दारे, यांचाही त्यांनी उल्लेख केला.

देशाचे भविष्य घडवताना तरुणांनी स्वतः ला एक महत्त्वाचा प्रश्न विचारला पाहिजे– आपल्याला देश कसा घडवायचा आहे? जाती–धर्माच्या भिंतींमध्ये अडकलेला देश की समता, बंधुता, विज्ञाननिष्ठ विचार आणि प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करणारा सक्षम भारत? आजच्या तरुणांच्या विचारांतून आणि कृतीतूनच या प्रश्नाचे उत्तर आकाराला येणार आहे. त्यामुळे तरुणांनी व्यापक दृष्टिकोन ठेवून शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड द्यावी आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन थोरात यांनी केले.

'PRISM 2026' सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, नव्या विचारांना आणि सामाजिक जाणिवांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर हदगाव तहसील कार्यालय चकाचक!

## राहुल कर्डिले यांच्या पाहणीनंतर तहसीलदार सय्यद उमर यांची तत्काळ कार्यवाही; कार्यालयातील अस्वच्छता हटवली

**तामसा (समर्थ गांवकरी)**

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हदगाव तहसील कार्यालयाला भेट देऊन पाहणी केली असता, कार्यालय परिसरात स्वच्छतेचा अभाव असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावेळी त्यांनी हदगावचे तहसीलदार सय्यद उमर यांना तहसील कार्यालयातील स्वच्छता सुधारण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेची तत्काळ दखल घेत तहसीलदार सय्यद उमर यांनी हदगाव तहसील कार्यालयातील स्वच्छता मोहीम राबवली. कार्यालय परिसरात साचलेली घाण आणि अस्वच्छता दूर करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

शासकीय कार्यालयात दररोज विविध कामांसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये–जा असते. त्यामुळे कार्यालयाचा परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनेनंतर तहसील प्रशासनाने स्वच्छतेबाबत केलेली कार्यवाही महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

आता स्वच्छता कायम राहणार का?

तहसील कार्यालयात स्वच्छता राखण्याबरोबरच तिचे सातत्याने पालन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर झालेली स्वच्छता केवळ तात्पुरती न राहता कार्यालयात नियमित स्वच्छतेची व्यवस्था कायम राहावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# नाना पाटेकर मंचावर विडंबन अभिनयातून ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर घणाघाती प्रहार

## कलाकारांच्या सादरीकरणाने प्रेक्षक सुन्न

**नांदेड (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड आणि नांदेड एज्युकेशन सोसायटी नांदेडच्या सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानतीर्थ– २०२६ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवातील रंगमंचावर कलाकारांनी केवळ अभिनय न सादर करता समाजातील विदारक वास्तवाचा आरसाच उभा केला. 'नाना पाटेकर मंच' वर पार पडलेल्या विडंबन अभिनय स्पर्धेत आजच्या ज्वलंत सामाजिक आणि राजकीय गोंधळावर कलाकारांनी जोरदार ताशेरे ओढले. विविध सामाजिक समस्या, आंदोलने आणि प्रशासकीय अनास्थेवर उपरोधिक शैलीत सादर केलेल्या कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली.

'इनकी सुरत को पहचानो भाई'ने उडवली झोप

कार्यक्रमात हिंदी विडंबन सादरीकरणादरम्यान 'इनकी सुरत को पहचानो भाई' या शीर्षकाखाली सादर झालेल्या अंकाने प्रेक्षकांना अंतर्मुख केले. देशात फोफावलेला भ्रष्टाचार, अशिक्षित मंत्र्यांची वक्तव्ये, मणिपूरमधील हिंसाचार, देशभरात पेटलेली शेतकरी व विविध जनआंदोलने आणि वाढती अंधश्रद्धा यांसारख्या गंभीर मुद्यांवर भेदक विडंबन सादर करण्यात आले. राजकीय स्वार्थापोटी सर्वसामान्यांचे होणारे हाल कलाकारांनी आपल्या धारदार संवादांतून समोर आणले.

पेपरफुटीपासून ते शेतकरी आत्महत्येपर्यंतचा आक्रोश

'सामाजिक गोंधळ' या थीमवर आधारित सादरीकरणात विद्यार्थ्यांच्या व्यथा प्रकर्षाने मांडण्यात आल्या. 'नीट' परीक्षेतील पेपरफुटी, स्पर्धा परीक्षांमधील घोटाळे, विद्यार्थ्यांचा खडतर संघर्ष आणि त्यातून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे विदारक दृश्य पाहून सभागृह सुन्न झाले. यासोबतच बळीराजाची सतत होणारी उपेक्षा व शेतकरी आत्महत्या, हिंदू–मुस्लिम ध्रुवीकरणाचे राजकारण, मतचोरीचे आरोप आणि तथाकथित भोंदूबाबांच्या ढोंगावर कलाकारांनी आपल्या विनोदी पण टोकदार शैलीत ताशेरे ओढले. उपेक्षित लोककलावंतांची व्यथाही या नाट्यात तितक्याच ताकदीने मांडली गेली.

मंचाचे नेटके नियोजन व व्यवस्थापन

या संपूर्ण सत्रादरम्यान नाना पाटेकर मंचाच्या व्यवस्थापनाची धुरा सायन्स कॉलेज, नांदेडचे प्राध्यापक व समन्वयक अत्यंत चोखपणे सांभाळत आहेत. मंचाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल मराठे, डॉ. प्रमोद कुलकर्णी, डॉ. वर्षा बोरगावकर यांच्यासह श्यामसुंदर गोरे, डॉ. श्रीकांत दुलेवाड आणि आशिष भारती यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सुयोग्य नियोजनामुळे स्पर्धा सुरळीत आणि उत्साहात पार पडली.

# शेठ टी. जे. हायस्कूलमध्ये नवरात्र महोत्सव भक्तिभावाने साजरा

## महिलांचा सन्मान, मुलींचे शिक्षण आणि समाजात समानता व मानवतेची भावना दृढ करण्याचा संदेश : नानजीभाई ठक्कर

**(समर्थ गांवकरी)**



शेठ टी. जे. हायस्कूलमध्ये नवरात्र महोत्सवानिमित्त देवीच्या आरतीचे भक्तिभावाने आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या शुभहस्ते देवीची आरती करण्यात आली.

या प्रसंगी शेठ टी. जे. हायस्कूल तसेच शेठ एन. के. ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती मनीषाबेन ठक्कर, इंग्रजी माध्यम शाळा अँड ज्युनिअर कॉलेजच्या श्रीमती लिडिया सालियन, शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की, नवरात्र हा केवळ धार्मिक सण नसून शक्ती, भक्ती, श्रद्धा, संस्कार आणि मानवतेचा पवित्र उत्सव आहे. माता दुर्गेने महिषासुराचा वध करून सत्य आणि धर्माच्या विजयाचा संदेश दिला. नवरात्रोत्सव आपल्याला जीवनात कितीही अडचणी आल्या, तरी सत्य, सदाचार आणि सत्कर्माचा मार्ग न सोडण्याची प्रेरणा देतो.

ते पुढे म्हणाले की, महिलांचा सन्मान करणे, मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे तसेच समाजात समानता आणि मानवतेची भावना दृढ करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे, कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न करणे आणि दुःखी तसेच अडचणीत असलेल्या व्यक्तींना मदतीचा हात देणे हीच खरी मानवसेवा आहे.

नवरात्रोत्सव आपल्याला स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याची, चांगल्या संस्कारांचे जतन करण्याची तसेच समाजात प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाची भावना वाढविण्याची प्रेरणा देतो, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

अशा प्रकारे धार्मिक श्रद्धेसोबतच संस्कार, शिक्षण, महिला सन्मान आणि मानवसेवेचा प्रेरणादायी संदेश देणारा नवरात्र महोत्सव शेठ टी. जे. हायस्कूलमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# करपणाऱ्या पिकांचे रक्षण करायला आमदार बाबूराव कदम कोहळीकर मैदानात!

## विधानभवनातील बैठकीत ईसापूरच्या पाण्याचा मार्ग मोकळा!

**हिमायतनगर (समर्थ गांवकरी)**



शेतकऱ्यांची सुकत चाललेली पिके वाचवण्यासाठी ईसापूर धरणाचे पाणी कालव्यात आलेच पाहिजे, अशी आक्रमक आणि न्याय्य भूमिका घेत आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांनी थेट मुंबई गाठली. मंगळवारी दुपारी ठीक ३ वाजता मुंबई येथील विधानभवन येथे झालेल्या एका अत्यंत वादळी आणि महत्त्वपूर्ण बैठकीत हिमायतनगर व हदगाव तालुक्यातील पाणीप्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार कोहळीकर यांच्या या आग्रही भूमिकेमुळे आता तालुक्यातील सुकणाऱ्या पिकांना नवसंजीवनी मिळण्याचे संकेत मिळाले आहेत.

मंगळवारी दुपारी ३ वाजता विधानभवनातील सभागृहात जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव श्री. एकनाथ डवले आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. बैठकीत आमदार कोहळीकर यांनी हिमायतनगर, सरसम आणि हदगाव परिसरातील दुष्काळी परिस्थितीचा पाढाच अधिकाऱ्यांसमोर वाचला. ऊस, केळी, हळद आणि कापूस ही नगदी पिके पाण्याच्या एका एका थेंबासाठी करपून जात असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. बैठकीदरम्यान कालव्यांच्या किरकोळ दुरुस्तीचे कारण पुढे करणाऱ्या अधिकाऱ्यांना आमदार कोहळीकर यांनी चांगलेच धारेवर धरले. त्यांनी कालव्यांची कामे युद्धपातळीवर पूर्ण करून हिमायतनगर तालुक्यातील्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवण्याचा सज्जड दम भरला. पिकांचे नुकसान झाल्यास शेतकरी सहन करणार नाही, हा इशारा मिळताच प्रशासकीय यंत्रणा तातडीने कामाला लागली आहे. या बैठकीत ईसापूरच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून तात्काळ पाण्याचे आवर्तन सोडण्यावर शिक्कामोर्तब झाले. हिमायतनगर परिसरातील हजारो एकर शेती वाचवण्यासाठी तांत्रिक अडचणी बाजूला ठेवून पाणी सोडण्याचे नियोजन सुरू झाले आहे. प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आमदार कोहळीकर यांच्या मागण्यांची गंभीर दखल घेत, पाणी सोडण्याचे आदेश लवकरच निर्गमित केले जातील असे आश्वासन दिले. विधानभवनातील मंगळवारच्या या यशस्वी बैठकीमुळे हिमायतनगर तालुक्यातील बळीराजाच्या आशा पल्लवित झाल्या असून, लवकरच ईसापूरचे पाणी शेतांमध्ये खळाळताना दिसणार आहे.

# केंद्रप्रमुख प्रवीण पाटील यांच्याविरोधात लेखी तक्रार, चौकशी करून कारवाईची मागणी

## शिक्षण विभागाकडे निवेदन, कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**हिमायतनगर (समर्थ गांवकरी)**

हिमायतनगर शिक्षण व्यवस्थेचा कणा असलेल्या केंद्रप्रमुखांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सरसम (बु.) येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेचे केंद्रप्रमुख प्रवीण पाटील यांच्या कथित निष्काळजीपणा विरोधात शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. केंद्रांतर्गत शाळांच्या नियमित भेटी, शिक्षकांशी समन्वय, केंद्रस्तरीय बैठका आणि कार्यालयीन कामकाजाबाबत गंभीर आक्षेप नोंदवत शिक्षणतज्ज्ञ विजय नारायण वाठोरे यांनी संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून नियमानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गटशिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र, पंचायत समिती हिमायतनगर यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनात केंद्रप्रमुख प्रवीण पाटील हे पदावर रुजू झाल्यानंतरही केंद्रांतर्गत शाळांना नियमित भेटी देत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. केंद्रस्तरीय बैठका आयोजित न करणे, शिक्षकांशी आवश्यक समन्वयाचा अभाव आणि शैक्षणिक कामकाजाचा नियमित आढावा न घेणे, यामुळे केंद्रातील शैक्षणिक व्यवस्थापनावर परिणाम होत असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे.

कर्तव्याशी संबंधित बाबींवर विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे दिली जात नसल्याचा, तसेच फोनवर संभाषण करताना आवाज चढवून हुज्जत घातली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. शैक्षणिक प्रशासनातील जबाबदारीच्या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडून समन्वयपूर्ण आणि उत्तरदायी वर्तन अपेक्षित असताना, अशा प्रकारच्या तक्रारी समोर येणे ही गंभीर बाब असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

संबंधित केंद्रप्रमुख कार्यालयीन वेळेत तसेच कामाच्या ठिकाणी मध्यस्थामार्फत कामकाज करत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. या प्रकरणाची केवळ वरवर चौकशी न करता संबंधित बाबींची सखोल व निष्पक्ष तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित फोन संभाषणांचे रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचे तक्रारदाराने नमूद करून आवश्यकतेनुसार ते सादर करण्याची तयारी दर्शवली आहे.

या सर्व आरोपांची तातडीने चौकशी करून तथ्यांच्या आधारे निर्णय घ्यावा, चौकशीत




दोष सिद्ध झाल्यास केंद्रप्रमुख प्रवीण पाटील यांच्यावर नियमानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीच्या कालावधीत केंद्रातील शैक्षणिक कामकाज विस्कळीत होऊ नये, यासाठी आवश्यक प्रशासकीय उपाययोजना करण्याची विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.

या गंभीर तक्रारीची दखल घेऊन संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी विजय नारायण वाठोरे यांनी केली आहे. तक्रारीवर योग्य कार्यवाही न झाल्यास कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.आता शिक्षण विभाग या तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेतो, चौकशी कधी सुरू होते आणि आरोपांबाबत कोणती भूमिका घेतली जाते, याकडे शिक्षकवर्गाचे व संबंधित शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# श्रीगोंद्यातील भव्य दांडिया स्पर्धेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग!

## हिरकणी ग्रुपने पटकावला प्रथम क्रमांक; सिनेअभिनेत्री रेवती लेले यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत वाढली

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहराच्या इतिहासात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या सखी सन्मती फाउंडेशन प्रस्तुत भव्य दांडिया स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रंगीबेरंगी वेशभूषा, आकर्षक दांडिया नृत्य आणि महिलांच्या उत्साहाने संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. सिनेअभिनेत्री रेवती लेले यांच्या विशेष उपस्थितीने कार्यक्रमाच्या आकर्षणात आणखी भर पडली. या स्पर्धेत हिरकणी ग्रुप, बेलवंडी यांनी प्रथम क्रमांक पटकावत बाजी मारली.

या कार्यक्रमाला आमदार हेमंत ओगले, पोलीस निरीक्षक सानप, माजी नगराध्यक्षा शुभांगी पोटे, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत ओगले, नगरसेविका दीपाली बोरुडे आणि उपसरपंच किरण लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दांडिया स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध नृत्य आणि विविध ग्रुपच्या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धक महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविल्याने कार्यक्रमाला भव्य स्वरूप प्राप्त झाले.

हिरकणी ग्रुपची प्रथम क्रमांकावर बाजी

ग्रुप स्पर्धेत बेलवंडी येथील हिरकणी ग्रुपने प्रथम क्रमांक मिळवत १० हजार १ रुपयांचे पारितोषिक पटकावले. सिद्धिविनायक ग्रुपने द्वितीय क्रमांक मिळवत ७ हजार १ रुपयांचे, तर नवरंगी नारी ग्रुपने तृतीय क्रमांक मिळवत ५ हजार १ रुपयांचे पारितोषिक जिंकले.

वैयक्तिक स्पर्धेत उत्कृष्ट वेशभूषेचा पुरस्कार प्रियांका वाघमारे यांनी पटकावला. त्यांना मेडल, ट्रॉफी आणि १ हजार १ रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. वैयक्तिक सादरीकरणामध्ये निकिता शर्मा यांनी बाजी मारली. त्यांनाही मेडल, ट्रॉफी आणि १ हजार १ रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

महिलांसाठी विशेष बक्षिसांची मेजवानी

स्पर्धेच्या निमित्ताने लेडीज ग्रुपसाठी विशेष बक्षिसांचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आदिका उदमले यांना टेबल फॅन, स्नेहा वाबळे यांना मिक्सर, तर मीना क्षीरसागर यांना हॉटकेस सेट देण्यात आला.

महिलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ

महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यातील सुप्त कलांना वाव देणे आणि महिलांना एकत्र आणून सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून आनंदाचे क्षण निर्माण करणे, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश होता. सखी सन्मती फाउंडेशनच्या संस्थापिका हेमांगी प्रशांत ओगले, रूपा लौकिक मेहता आणि प्रणाली सुमेध गजभिये यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महिला ग्रुपच्या सहकार्याने हा उपक्रम उत्साहात पार पडला.




स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिला स्पर्धकांचे, उपस्थित मान्यवरांचे आणि कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

# शाळांच्या विकासात समाजाचे योगदान महत्त्वाचे : बा. ठ. झावरे

## वासुंदे जिल्हा परिषद शाळेत 'मिशन आपुलकी'तून मदत

पारनेर (समर्थ गांवकरी)

शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी करणारे संस्कारकेंद्र आहे. त्यामुळे शाळेच्या विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन योगदान देणे गरजेचे आहे. 'मिशन आपुलकी'सारख्या उपक्रमांमुळे शाळांना आवश्यक साहित्य व सुविधा उपलब्ध होत असून, त्याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. समाज आणि शाळा यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या तर त्यांच्या गुणवत्तेला आणि आत्मविश्वासाला निश्चितच चालना मिळेल, असे मत गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे यांनी व्यक्त केले.

वासुंदे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मिशन आपुलकी'च्या माध्यमातून शाळेला आवश्यक मदत करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षक प्रल्हाद भालेकर यांची बदली झाल्याने त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निरोप देण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुदत्त पतसंस्था चेअरमन बा. ठ. झावरे, होते. यावेळी केंद्रप्रमुख दिपक लोंढे सर, माजी सैनिक राजेंद्र शिर्के, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपटराव हिंगडे, माजी सरपंच विमल झावरे, पोपट द. साळुंके गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब सैद, शिक्षक नेते संतोष खामकर, दिलीप पाटोळे, पी. डी. बर्वे, पो. मा. झावरे, धनंजय महाराज उदावंत, अंबादास झावरे, बाळासाहेब झावरे, युवा नेते अमोल उगले, उद्योजक बापूसाहेब गायखे, मारुती उगले, बाळासाहेब शिंदे, प्रल्हाद भालेकर, बाळासाहेब खराबी, भाऊ वाकचौरे, भास्कर झावरे, गोपाळा बर्वे, किरण गायखे, बबन तळेकर, नितीन शिर्के मुख्याध्यापिका सुनिता रोहोकले, सहशिक्षिका संगिता शेळकंदे मॅडम व श्रीम. उषा पवार मॅडम आदी उपस्थित होते.




मिशन आपुलकीअंतर्गत प्रल्हाद भालकेर यांनी शाळेच्या नावाचे अ‍ॅक्रेलिक बोर्ड, तर माजी सैनिक राजेंद्र शिर्के यांनी वॉटर प्युरिफायर व सर्व मुलांसाठी स्पोर्ट ड्रेस देण्याची मदत केली. सुमन झावरे यांनी कपाट, अंबादास झावरे यांनी लेक्चर स्टँड, लोकवर्गणीच्या माध्यमातून स्पीकर यू.एस.बी. सिस्टिम, बाळासाहेब झावरे यांनी लेझीम, अमोल उगले यांनी प्रिंटर व कॉम्प्युटर सेट

कै. एस.एल. झावरे यांच्या स्मरणार्थ मुली–पत्नी यांच्याकडून पिंपळी झाडे, स्टील डोल व ताशा देण्यात आले. शोभा हिंगडे यांनी LED TV, तर पारूबाई ढोकळे यांनी वॉल फॅन दिला. धनंजय महाराज उदावंत यांनी कापडी चटई, सहकारी दाते यांनी ग्रंथालयासाठी पुस्तके, तर बा.ठ. झावरे आणि पोपट साळुंके यांनी खुर्च्या दिल्या.

रामदास झावरे यांनी रोपांसह सर्व कुंड्या उपलब्ध करून दिल्या. बबन तळेकर यांनी ₹५०००, तर सुभाष भालकेर यांनी ₹२५०० आर्थिक मदत केली.

# अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश

## खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला आनंद

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर येथे नव्याने मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचे प्रवेश पूर्ण होऊन महाविद्यालय प्रत्यक्ष सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थी, अधिष्ठाता, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे, ही अनेक वर्षांपासूनची इच्छा पूर्ण झाल्याने मनस्वी आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान जिल्ह्यातील नागरिकांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी केली होती. त्यावेळी खासदार झाल्यानंतर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय आणण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार खासदार झाल्यानंतर या महाविद्यालयासाठी पाठपुरावा केला. खासदार सुप्रिया सुळे यांनीही यासाठी सहकार्य केले. त्यातून महाविद्यालयाला मंजुरी मिळाली असून, आता पहिल्या तुकडीतील १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. लांब यांना विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील कामाचा अनुभव असून, त्यांनी नव्या संस्थेचे आव्हान स्वीकारले आहे. त्यांच्यासह प्राध्यापक आणि कर्मचारीवर्ग महाविद्यालयाच्या कामकाजासाठी कार्यरत आहे. या वेळी खासदार लंके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

कोटा येथील एक विद्यार्थी अहिल्यानगरमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी दाखल झाल्याचे समजल्यावर त्यांनी आनंद व्यक्त केला. आपल्या भागातील विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी बाहेर जात असताना अन्य भागांतील विद्यार्थी अहिल्यानगरमध्ये शिक्षणासाठी येणे ही अभिमानाची बाब



असल्याचे ते म्हणाले.

महाविद्यालयाच्या मंजुरीच्या प्रक्रियेत कोणी प्रयत्न केले किंवा कोणी विरोध केला, यावर आता चर्चा करण्यापेक्षा संस्थेच्या प्रगतीला प्राधान्य दिले पाहिजे. ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे, तसेच विरोध करणाऱ्यांचेही आभार मानून आता पुढे जाण्याची गरज आहे. महाविद्यालय सुरू झाले असून विद्यार्थ्यांचे प्रवेशही झाले आहेत. त्यामुळे जुन्या वादांमध्ये न अडकता संस्थेच्या विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे मत खासदार लंके यांनी व्यक्त केले.

# पोखरीतील गायरान अतिक्रमण हटविण्यासाठी पवार कुटुंबीयांचे आमरण उपोषण सुरु

## गट क्रमांक १९ मधील बांधकाम थांबवून जागेवर स्थगिती देण्याची मागणी

पारनेर (समर्थ गांवकरी)




पारनेर तालुक्यातील पोखरी येथील गट क्रमांक १९ मधील शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवावे, तसेच संबंधित जागेवर सुरू असलेले बांधकाम तातडीने थांबवून जागेवर स्थगिती आदेश द्यावा, या मागणीसाठी रावसाहेब कुंडलिक पवार व त्यांची आई हौसाबाई कुंडलिक पवार हे गेल्या पाच दिवसांपासून पोखरी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत.

पोखरी गावातील गावठाण परिसरातील गट क्रमांक १९ मधील जागेवरून पवार दाम्पत्याचा वाद सुरू आहे. या जागेच्या वादातून आपल्यावर हल्ला झाल्याची तक्रार पवार यांनी २ जून रोजी पारनेर पोलीस ठाण्यात दाखल केली होती. मात्र, या प्रकरणात संबंधित प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई झाली नसल्याचा आरोप करत त्यांनी यापूर्वी २९ जूनपासून पोखरी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. सात दिवसांनंतर गावातील पंच कमिटीच्या मध्यस्थीने हे उपोषण मागे घेण्यात आले होते.

मात्र, संबंधित जागेचा वाद अद्यापही कायम असल्याने पवार दाम्पत्याने पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवून सुरू असलेले बांधकाम थांबवावे आणि संबंधित जागेवर स्थगिती आदेश द्यावा, अशी त्यांची मागणी आहे.

या प्रकरणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पालकमंत्री, पोलीस प्रशासन तसेच संबंधित महसूल विभाग आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत. संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

### पोखरीतील गायरान अतिक्रमणधारकांना ग्रामपंचायतीचा इशारा

पोखरी येथील शासकीय गुरेचराई गट क्रमांक १९ मधील अतिक्रमण हटविण्यासाठी रावसाहेब कुंडलिक पवार व हौसाबाई कुंडलिक पवार उपोषणाला बसले आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत पोखरीच्या वतीने प्रसिद्धीपत्रक काढून संबंधित सर्व अतिक्रमणधारकांना आपापली अतिक्रमणे तात्काळ काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अतिक्रमणे स्वतःहून न काढल्यास ती हटविण्यासाठी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही ग्रामपंचायतीने दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात ग्रामपंचायत प्रशासनाच्या भूमिकेकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.




